मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रेसनोट

## ❖ मिरा-भाईंदर महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग अंतर्गत अग्निशामक दल, स्वच्छता निरीक्षक व इतर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

दिनांक ३० ऑक्टोबर २०२५ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका मा. आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से.) यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका आपत्ती व्यवस्थापन विभाग अंतर्गत अग्निशामक दल, स्वच्छता निरीक्षक व इतर महानगरपालिका कर्मचाऱ्यांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण ३० आणि ३१ ऑक्टोबर २०२५ या दोन दिवसांदरम्यान पार पडणार असून, आगा खान हॅबीटॅट ऑफ इंडिया या संस्थेमार्फत हे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

आपतीच्या प्रसंगी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी अधिक परिणामकारक, समन्वयित आणि तत्परतेने कार्य करावे यासाठी त्यांच्या कौशल्यात आणि सज्जतेत वाढ करणे हे या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट आहे. शहरात वाढत्या नागरीकरणामुळे आणि विविध आपत्तीजन्य घटनांच्या पार्श्वभूमीवर, आपत्कालीन प्रतिसाद पथक अधिक सक्षम बनविणे आवश्यक आहे. या अनुषंगाने, प्रशिक्षण सत्रात आग प्रतिबंध व नियंत्रण, पूर, भूकंप, इमारत कोसळणे, वीज अपघात तसेच इतर नैसर्गिक आणि मानवनिर्मित आपत्तींसाठी प्रत्यक्ष कार्यपद्धतींचा सराव करून घेतला जाणार आहे.

आपतीच्या काळात प्रत्येक क्षण महत्वाचा असतो. अशा वेळी अग्निशमन दलाची तत्परता आणि कार्यक्षम प्रतिसाद हेच नागरिकांच्या सुरक्षिततेचे मुख्य साधन असते. त्यामुळे त्यांच्या प्रशिक्षणावर आणि तांत्रिक ज्ञानवृद्धीवर विशेष भर देण्यात येत आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिका प्रशासन हे नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि शहराच्या आपत्ती प्रतिसाद क्षमतेसाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या प्रशिक्षणामुळे

अग्निशमन दल अधिक सक्षम, सज्ज आणि प्रशिक्षित होऊन कोणत्याही आपतीला प्रभावीपणे सामोरे जाऊ शकेल, असा विश्वास मिरा भाईंदर महानगरपालिका प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आला आहे.